महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## बारामती परिमंडळ, बारामती.

CIN: U40109MH2005SGC153645
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)

दाखल तारीख :–३०/०१/२०१९
आदेश तारीख :–१४/०३/२०१९

**आदेश**

**केस क्र. ०३/२०१९**

| | |
|---|---|
| १) श्री.रणजित मदन पाटील.,<br>रा. काले, ता. कराड,<br>जि. सातारा. | तक्रार अर्जदार (ग्राहक) |

**विरुध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता.,<br>म.रा.वि.वि.कं.मर्या,<br>कराड विभागीय कार्यालय. | विरुध्द पक्षकार (महावितरण) |

कोरम:– १) श्री. बी. डी. गायकवाड, अध्यक्ष,
२) श्री. एस. के. जाधव, ग्राहक सदस्य,
३) श्री. एम. ए. लवटे, सदस्य सचिव,

उपस्थिती:– १) श्री.रणजित मदन पाटील, ग्राहक
२) श्री. एस. बी. आळतेकर, ग्राहक प्रतिनिधी
३) श्री. जे. जी. कुंभार, उपकार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. कराड ग्रा.१ उपविभाग.
४) श्री. व्ही. जे. फाळके, सहाय्यक लेखापाल, म.रा.वि.वि.कं.मर्या. कराड ग्रा.१ उपविभाग.

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६, मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## तक्रारीचे स्वरुप

१) तक्रारदार ग्राहक श्री. रणजित मदन पाटील, रा. काले, ता. कराड, जि. सातारा ग्राहक क्र. १९७३२०००२८३२ चा वीज जोड दुध संकलन व दुध शितकरणासाठी असून वर्गवारी औद्योगिक आहे. मा. अतिरिक्त कार्यकारी अभियंता भरारी पथक सातारा यांनी स्थळ तपासणी केली. औद्योगिक ऐवजी व्यवसायिक वर्गवारी लागू करुन दिलेले फरकाचे बील व व्यवसायिक वर्गवारीने येणारी विज देयक रद्द करुन पुन्हा औद्योगिक वर्गवारी लागू करावी अशी तक्रार दाखल केली आहे.

## तक्रार अर्जदार (ग्राहक) यांचा तोंडी युक्तीवाद

श्री. रणजित मदन पाटील, यांचे अधिकृत प्रतिनिधी श्री. एस.बी. आळतेकर यांनी खालील प्रमाणे युक्तीवाद केला माझे मौजे–काले ता. कराड, जि. सातारा येथे आद्योगिक ८ एचपी विद्युत पुरवठा दि. २८/०२/२०११ पासून नियमित चालु आहे. नियमित येणारे मासिक देयक वेळोवेळी भरलेले आहे.

दिनांक २१/०८/२०१७ रोजी भरारी पथक, सातारा यांनी माझे विद्युत पुरवठयाची तपासणी करुन त्याची प्रत मजला दिलेली आहे. सदरची तपासणी झाल्यानंतर मा. उपकार्यकारी अभियंता ग्रामिण उपविभाग कराड क्र.१ यांनी मजला मे २०१८ मधील वीजदेयकामध्ये रुपये २,१४,७१० इतक्या रक्कमेच्या फरकाचे देयक दिले आहे. उपकार्यकारी अभियंता यांनी सदरचे देयक देताना Multiyear Tariff order dated 26.06.2015 in case No. 121/2014 प्रमाणे LT Non Residential. Connection Clause No (M) प्रमाणे दिलेले आहे ते चुकीचे असून आम्हास Commercial Circular No. 275 dated 18/11/2016 च्या LT V (B) Industry General प्रमाणे व त्यातील Clause No. (b) प्रमाणे देयक द्यावयास हवे होते सदर ग्राहकाचे मौजे काले येथे आजुबाजूच्या वाडयावस्त्यावर दुध संकलन करणे, त्याच्यावर शितकरण प्रक्रिया करुन ते बाहेर देणे हा उद्योग आहे.

म. कार्यकारी अभियंता यांनी चर्चेच्या वेळी दिलेल्या सलल्याप्रमाणे माहे मे २०१८ च्या देयकापोटी आलेली रक्कम रुपये २१४७१० पैकी तीन हप्त्यामध्ये भरण्यास सुंचविल्याप्रमाणे त्यातील पहिला हप्ता रुपये ७१५७० अंडर प्रोटेस्ट भरलेला आहे.

१) आम्हास Tariff order dated 26.06.2015 in case No. 121/2014 या परिपत्रका प्रमाणे वर्गवारी लागू न करता Commercial Circular No. 275 dated 18/11/2016 या प्रमाणे औद्योगिक वर्गवारी लागू करावी.

२) मे २०१८ च्या बीलात दिलेली वर्गवारी फरकाची रक्कम रु २,१४,७१० रद्द करावी व सदर फरकाच्या रकमेपैकी रुपये ७१,५७० अंडर पोटेस्ट म्हणून भरलेली आहे.

## विरुध्द पक्षकार (महावितरण) यांचा तोंडी व लेखी युक्तीवाद

श्री. रणजित मदन पाटील रा. काले, ता. कराड, जि. सातारा यांचा ग्राहक क्र. १९७३२०००३२ असून दि. २८.०२.२०११ रोजी ८ एचपी वीज जोडभार मंजूर केलेला आहे. सदर वीजजोडभार हा मे. कृष्णाई मिल्क सेंटर या संस्थेला वापर होत आहे. या संस्थेला आद्योगिक LT V (B) ऐवजी वाणिज्य LT II (A) या वर्गवारीप्रमाणे चुकीचे वीजदेयक दिलेले असल्याचे नमूद केले आहे.

उपकार्यकारी अभियंता कराड ग्रा.१ यांच्या १४.०२.२०१९ प्राप्त झालेल्या खुलाशानुसार अति. कार्यकारी अभियंता भरारी पथक सातारा यांनी २४.०८.२०१७ रोजी श्री. रणजीत मदन पाटील मु.पो काले ता. कराड जि. सातारा यांचे मे. कृष्णाई मिल्क सेंटर या संस्थेची पाहणी केली होती. सदर वीज जोडणीची तपासणी केली असता. त्या ठिकाणी Milk Processing/Chilling activity असे काही आढळून आले नाही. त्याठिकाणी फक्त ३ अंश ते ४ अंश सेल्सीयस या तापमानामध्ये थंड करुन ते पुढे वहातुक करुन जवळच्या डेअरीला देताना आढळून आले. सदर ठिकाणी सदर ग्राहकांचे दुध संकलन व विक्री होत असले नुसार सदर ग्राहकांस आद्योगिक वर्गवारी ऐवजी व्यवसायिक वर्गवारी करणेबाबतच्या सुचना संदर्भ पत्र क्र. ४ अन्वये भरारी पथक सातारा यांचेकडून देण्यात आल्या होत्या त्याप्रमाणे माहे जून २०१५ जे स्टेंबर २०१७ कालावधीचे टेरीफ फरकाचे वीज देयक रु १,७३,९३० इतके श्री. रणजीत मदन पाटील यांना देण्यात आले आहे.

## कारणमिमांसा

१) तक्रारदार ग्राहकाचा ८ एचपी मंजूर भार असून वापर ८ एचपी आहे. दुध संकलन करणे यासाठी अत्यल्प वीज वापर होतो. ८ एचपी जोड भाराचा वापर दुध संकलन करुन ते पुढे डेअरीला पोहोच करे पर्यंत खराब होऊ नये म्हणून ३ अंश ते ४ अंश सेल्ससीयस तापमानावर ठेवले जाते. ही प्राथमिक दुग्ध प्रक्रियाच आहे. तक्रारदार ग्राहकाने दुध थंड करण्याच्या मशिनरीचे फोटो ग्राफ सादर केले आहेत. ग्रामपंचायतीचा दाखला सादर केला आहे. सदर ठिकाणी फक्त दुध गोळा केले जात नाही तर थंड केले जाते त्यामुळे सदर दुध संकलन व दुध शितकरणास व्यवसायिक वर्गवारी लागू होत नाही. MERC केस क्र. १२१/२०१४ दि. २६/०६/२०१५ च्या वर्गवरी ओदशानुसार LT V (B) Industry General मधील लागू क्लॉज (B) Milk Processing/Chilling Plants (Dairy) आद्योगिक वर्गवारी लागू होत आहे.

फक्त दुध संकलनासाठी व्यवसायिक वर्गवारी लागू होते कारण दुध संकलनासाठी अत्यल्प वीज वापर होतो सदर ग्राहकाचे दुध संकलन व शितकरण आहे. जून २०१५ ते सप्टेंबर २०१७ या कालावधीतील व्यवसायिक वर्गवारीने दिलेले फरकाचे बील रुपये १,७३,९३० रद्द होणेस पात्र आहे.

ग्राहकाने ऑक्टोबर २०१७ ते एप्रिल २०१८ या कालावधीतील व्यवसायिक वर्गवारीने आलेली वीज देयके भरणा केलेचे पुरावा सादर केलेला नाही.

मे २०१८ मध्ये दिलेल्या वीज देयकापोटी ग्राहकाने अंडर प्रोटेस्ट म्हणून रुपये ७१,५७० भरणा केल्याचे तोंडी म्हणण्यामध्ये नमूद केले आहे.

जून २०१८ नंतर व्यवसायिक वर्गवारीने आलेली वीजदेयक भरणा केलेचे पुरावा सादर केलेला नाही.

मंच पुढील प्रमाणे आदेश करीत आहे.

# आदेश

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) जून २०१५ ते सप्टेंबर २०१७ या कालावधीतील आद्योगिक ते वाणिज्य वर्गवारी फरकाचे बील रु. १,७३,९३० रद्द करण्यात येत आहे.

३) **LT V (B)** आद्योगिक वर्गवारी लागू करुन पुढील वीज देयके औद्योगिक वर्गवारीने देण्यात यावीत.

४) वरील आदेशाचे पालन करुन आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून ६० दिवसाचे आत मंचास अहवाल सादर करावा.

(श्री. बी. डी. गायकवाड)
अध्यक्ष

(श्री. एस. के. जाधव )
ग्राहक सदस्य,

(श्री. एम. ए. लवटे )
सदस्य सचिव